# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.10.2025** **वार- सोमवार**

---

**आरक्षण सोडत**

पुणे जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ७३ गटांच्या आरक्षणाची सोडत आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली.

या सोडतीनुसार अनुसूचित जातीसाठी ७, अनुसूचित जमातीसाठी ५, तर नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्गासाठी १९ गट राखीव ठेवण्यात आले असून, त्यापैकी १० जागा महिलांसाठी आहेत.सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४२ गट राखीव असून, त्यापैकी २० गट महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.  विविध प्रवर्गांनुसार सदस्यपदांचं आरक्षण निश्चित करण्यात आलं आहे.

**मतदारयादी**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगानं  स्थानिक यादीऐवजी आयोगाचीच मतदार यादी वापरण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार १ जुलै २०२५ ची मतदार यादी अंतिम मानली जाणार आहे. सध्या पुणे महापालिकेकडे ३५ लाख मतदारांची यादी प्राप्त झाली असून पुढील टप्प्यात  प्रभागनिहाय यादी तयार करण्याचे काम हाती घेतलं जाणार आहे.

**‘एआय’  मोफत**

ऊस पिकात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे  एआय  तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट अर्थात व्हीएसआयनं महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ‘एआय’  तंत्रज्ञान ऊस शेतीमध्ये वापरण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणात पाच हजार शेतकऱ्यांना ‘प्रथम येणाऱ्यास प्राधान्य’  या तत्त्वानुसार विनामूल्य सहभागी होता येणार आहे.‘व्हीएसआय’  मध्ये नुकत्याच झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला. ऊसशेतीमध्ये ‘एआय’  तंत्रज्ञान वापर करण्यासाठी आत्तापर्यंत ८५० शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवला असून उर्वरित चार हजार १५० शेतकऱ्यांची निवड केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाने महासंघाचे माजी अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, आदी यावेळी उपस्थित होते.

**<u>पुरस्कार</u>**

संवेदशील वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्ती, संस्थांमुळेच समाजातील दुःखितांना जगण्यात आनंद मिळण्याची उमेद मिळते," असं प्रतिपादन राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं. उमेद फाऊंडेशन संचालित दिव्यांग मुलं आणि त्यांच्या पालकांसाठी असलेल्या  बालक-पालक प्रकल्पाच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त काल मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रेरणा पुरस्कार देण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगर इथल्या स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी होते. यावेळी डॉ. रितेश आणि उल्का नेहेते, चिंतामणी आणि राजेश्वरी राशीनकर  अभिमन्यू पोटे , अमृता भिडे या पालकांना 'प्रेरणा पुरस्कार', तर वैद्यकिय सेवेत योगदानाबद्दल डॉ. प्रदीप देशपांडे यांना सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<u>कर्तव्यरत्न</u>**

“स्वच्छता कर्मचारी हे समाजातील खरे हिरो आहेत. तुम्हाला सन्मानित करताना आम्हाला अभिमान वाटावा असा हा क्षण आहे. या निमित्ताने अर्थपूर्ण कार्य घडत आहे” , असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध

अभिनेते पुष्कर जोग यांनी काढले. निस्वार्थ सेवा करणाऱ्या मनपा कर्मचाऱ्यांचा हृद्य सत्कार करून त्यांच्या योगदान गौरविण्यासाठी पुण्यात काल कर्तव्यरत्न पुरस्कार सोहोळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यामध्ये ते बोलत होते. एनइसीसी आणि व्हेनकॉब या संस्थांच्या वतीनं आणि पुणे महानगरपालिकेच्या सहकार्यानं हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**<u>त्रिधारा</u>**

ऋत्विक फाऊंडेशन फॉर परफॉर्मिंग आर्टस् तर्फे आयोजित 'त्रिधारा' या विशेष सांगीतिक कार्यक्रमात काल किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित कैवल्यकुमार गुरव, ग्वाल्हेर-आग्रा घराण्याच्या गायकीची परंपरा यशस्वीपणे पुढे नेणाऱ्या मुकुल कुलकर्णी यांच्यासह युवा पिढीतील आश्वासक शास्त्रीय गायक अभेद अभिषेकी यांच्या सुरेल स्वराविष्कारात रसिकांनी 'त्रिधारा' मैफलीचा आनंद लुटला. कलाकारांचा सत्कार ऋत्विक फाऊंडेशनच्या संचालिका चेतना कडले, सुप्रसिद्ध सरोद वादक अनुपम जोशी, प्रसिद्ध गायिका सुमन नागरकट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

**<u>तपासणी</u>**

अन्न आणि औषध प्रशासनाकडून म्हणजे एफडीए तर्फे पुणे जिल्ह्यात आत्तापर्यंत २२ औषध दुकानांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत दोन विक्रेते कफ सिरप आणि इतर औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकत असल्याचे आढळल्यानं त्यांच्यावर तत्काळ औषध विक्री बंद करण्याची कारवाई करण्यात आली. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कफ सिरपची विक्री करणाऱ्या औषध विक्रेत्यांविरोधात कारवाईची मोहीम एफडीएनं हाती घेतली आहे. तीन औषध दुकानदारांना 'कारणे दाखवा' नोटीस देण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. आगामी काळात ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

**<u>क्रीडा</u>**

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी ऑफ इंजीनियरिंग कॉलेज आणि पुणे शहर क्रीडा विभाग यांच्या वतीने जिल्हास्तरीय अंतर महाविद्यालय फुटबॉल स्पर्धा पार पडल्या. अंतिम फेरीत नेस वडिया महाविद्यालय संघाने अजिंक्यपद पटकावले.  त्यांनी पूना कॉलेज संघावर विजय मिळवला.

पिंपरी चिंचवड महापालिका आणि रोटरी क्लब यांच्या सहकार्याने काल रनाथॉन आयोजित करण्यात आली होती यामध्ये सुमारे 3000 धावपटू धावले. या मोहिमेचे यंदाचे चौदावे वर्ष असून यावेळी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अण्णा बोधडे यांनी धावपटूंना स्वच्छतेची शपथ दिली. आरोग्य पर्यावरण आणि महिला सक्षमीकरण याविषयीची जनजागृती या मोहिमेत करण्यात आली.

हॉकी महाराष्ट्र संघटनेच्या वतीने नेहरूनगर मैदानावर एम. जे. कप मेमोरियल हॉकी राज्यस्तरीय स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात वरिष्ठ गटात आयकर विभागाने पीसीएमसी अकादमीवर 3-0 अशी सहज मात केली तर ज्युनिअर गटात हॉकी लवर्स आणि पूना हॉकी अकादमीने चमकदार विजय मिळवले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि  परिसरात आता उन्हाचा कडाका जाणवू लागला आहे. आज कमाल तापमान ३३,तर किमान तापमान  किमान १८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**